# नवीन कायदे कामगारांच्या न्याय, सुरक्षितता व सामाजिक संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण – कामगार मंत्री आकाश फुंडकर

प्रतिनिधी ४ जुलै

**मुंबई :** कामगारांच्या न्याय, सुरक्षितता, सामाजिक संरक्षण आणि हक्कांच्या बळकटीकरणासाठी केंद्र सरकारने पूर्वीचे २९ कामगार कायदे एकत्रित करून चार कायदे तयार केले आहेत. या नवीन श्रमसंहितामुळे कामगारांना अधिक संरक्षण, सामाजिक सुरक्षा आणि न्याय मिळेल, असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विधानमंडळात सांगितले.

विधानपरिषदेत नियम २६० अंतर्गत कामगार विभागाच्या चर्चेदरम्यान विविध सदस्यांनी कामगार योजनांबाबत कामगार संघटनांशी व्यापक चर्चा करण्याची मागणी केली. त्यास उत्तर देताना कामगार मंत्री फुंडकर बोलत होते. मंत्री फुंडकर म्हणाले की, अनेक दशकांपूर्वीचे २९ कामगार कायदे आजच्या औद्योगिक परिस्थितीशी सुसंगत राहिले नव्हते. त्यातील विसंगती दूर करून कामगारांचे हित अधिक प्रभावीपणे जपण्यासाठी वेतन, औद्योगिक, सामाजिक सुरक्षा आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कार्यस्थळ परिस्थिती संहिता तयार करण्यात आली असून, राज्यात त्यानुसार नियम तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



नियमांचा मसुदा सार्वजनिक सूचना व हरकतींसाठी उपलब्ध करून देण्यात आला असून, प्राप्त झालेल्या सर्व सूचना व हरकतींचा गांभीर्याने विचार करूनच अंतिम नियम निश्चित केले जातील. यासंदर्भात कामगार संघटनांशी पुन्हा चर्चा करून सर्व संबंधितांच्या सूचना विचारात घेतल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. नवीन श्रमसंहितांमुळे उद्योगांना चालना मिळतानाच अधिक कामगारांना कायमस्वरूपी रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि वैधानिक लाभ मिळतील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सांगितले की, कोणत्याही कामगार संघटनेवर अन्याय होऊ दिला जाणार नाही. कंत्राटी व असंघटित कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात येईल. कोअर ॲक्टिव्हिटीमध्ये नियमबाह्य पद्धतीने कंत्राटी कामगारांकडून काम करून घेतल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. गिरणी कामगारांच्या घरांसाठी १ लाख ७०५ पात्र अर्जांची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून म्हाडाच्या माध्यमातून त्यांना घरे देण्यात येतील.

अपात्र अर्जदारांनाही आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची आणखी एक संधी देण्यात आली आहे. असंघटित कामगारांसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करून सामाजिक सुरक्षा, गृहनिर्माण, शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या योजना राबविण्यात येणार असून, त्यासाठी सीएसआर निधीचाही वापर केला जाणार आहे. समृद्धी महामार्गावरील अपघातांच्या पार्श्वभूमीवर कामगारांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. तसेच विविध प्रकरणांमध्ये दोषी उद्योगांवर कारवाई करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील, असेही त्यांनी सांगितले. नवीन श्रमसंहितांमुळे कामगार अधिकारी अधिक सक्षम होतील आणि कामगारांवरील अन्यायाला आळा बसेल. अतिरिक्त कामासाठी ओव्हरटाईमचे मानधन देणे बंधनकारक करण्यात आले असून, त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईची स्पष्ट तरतूद आहे. बांधकाम कामगारांच्या बनावट नोंदणीविरोधात राज्यभर विशेष मोहीम राबवून अनेक गुन्हे दाखल करण्यात आले असून, कामगार कल्याण मंडळाच्या योजनांमध्येही कामगारांच्या सूचनांनुसार आवश्यक सुधारणा करण्यात येणार असल्याचे कामगार मंत्री फुंडकर यांनी सांगितले.

# सराईत गुन्हेगारांना अटक करून नवी मुंबई गुन्हे शाखेने आणले 11 गुन्हे उघडकीस

प्रतिनिधी ४ जुलै



**मुंबई :** पोलिस आयुक्त मिलींद भारंबे, दीपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, प्रमोद शेवाळे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरातील घरफोडी व सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीसआणणे बाबत आदेश दिले होते.


०७/०६/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वा. ते सायंकाळी २०:२८ वा. चे दरम्यान फिर्यादी श्री. प्रमोद भालचंद्र वादळ, रा. रूम नं. १०२, स्वस्तिक जमुना को. ऑप. हौ. सोसायटी, सेक्टर १२ बी, प्लॉट क्रमांक ६५, बोनकोडे, नवी मुंबई यांचे सदनिकाच्या मुख्य दरवाजाचा कडी कोयंडा तोडून १५,५५,०००/- रू. किं. चे सोन्याचे दागिने व रोख रक्कम तसेच त्यांचे शेजारी संजय शंकर नागरे यांचे सदनिका मधुन ४०,०००/- रू. रोख रक्कम असे एकुण १५,९५,०००/- रू. किं. ची मालमत्ता घरफोडी चोरी करून नेला म्हणुन अज्ञात चोरटयाविरूध्द कोपरखैरणे पोलीस ठाणे गु.र.नं. ३००/२०२६, भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१ (३), ३३१ (४) प्रमाणे दिनांक ०८/०६/२०२६ रोजी दाखल होता.

नवी मुंबई गुन्हे शाखा, कक्ष-१ वाशीचे अधिकारी व अंमलदार यांनी वरील नमुद गुन्हयाच्या समांतर तपासादरम्यान घटनास्थळ व आजुबाजुच्या परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजची अविरत पाहणी केली. प्राप्त सी.सी.टी. व्ही. फुटेजमधील दोन आरोपी अत्याधुनिक तांत्रिक साधनांचा वापर करून निष्पन्न केले. सदर दोन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार असल्याबाबत बातमीदारांकडुन व त्यांना पुर्वी अटक केलेल्या तपासी अंमलदार यांचेकडुन खात्री करण्यात आली. सदर आरोपीत याचेबाबत अधिक माहिती प्राप्त केली असता सदर आरोपीत यांचा कोणताच ठावठिकाणा नसुन ते त्यांचे पत्त्यावर राहत नसल्याबाबत माहिती प्राप्त झाली. सदर गुन्हयातील आरोपीबाबत सखोल तपास केला असता ते दररोज मिरा भाईंदर, चेंबुर, मुंबई, ठाणे व नवी मुंबई परीसरातील वेगवेगळया डॉरमेटरी व लॉज मध्ये राहत होते.

सदर आरोपींचा सलग १६ दिवस मागोवा घेवुन आरोपी १) युसुफ रशिद शेख उर्फ दिपक उर्फ राहुल, वय ४२ वर्ष, रा. रुम नं. १०४, बिल्डींग नं. बी ३२, म्हाडा कॉलनी, आर.एन.ए. पार्क समोर, माहुल रोड, वाशी नाका, चेंबुर, मुंबई व २) नौशाद मुस्ताक आलम उर्फ सागर, वय ३२ वर्ष, रा. प्रकाश चाळ, रूम नं. ०१, सेक्टर ९, कामोठे, नवी मुंबई यांना दिनांक २३/०६/२०२६ रोजी १८.२५ वा. यांना कोपरखैरणे परिसरातुन ताब्यात घेवुन अटक केले.

अटक आरोपींकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता त्यांनी कोपरखैरणे, पनवेल तालुका, बदलापुर, वाशींद, नारपोली परीसरात घरफोडीचे इतर ०९ गुन्हे व आरोपी नौशाद मुस्ताक आलम उर्फ सागर याने त्याचे अन्य साथीदारासह खारघर व बाजारपेठ परिसरात ०२ चैन स्नॅचिंगचे गुन्हे केल्याचे कबुल केले. सदर गुन्हयाचे तपासात अटक आरोपींकडुन कोपरखैरणे पोलीस ठाणे गु.र.नं. ३००/२०२६ मधील चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी ९,४७, ३४०/- रू. किंमतीचे सोन्याचे दागिने, कोपरखैरणे पो. ठाणे गु.र.नं. २४७/२०२६ मधील ८४,७००/- रू. किंमतीची सोन्याची चैन, पनवेल तालुका मधील एक टिव्हिएस अपाची मोटार सायकल व खारघर पो. ठाणे मध्ये गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटार सायकल असा एकुण ११,६७,०४०/- रू. किंमतीचे सोन्याचे दागिने व ०२ मोटार सायकल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून तपास सुरू आहे.

# मुंबईकरांनो गरज असेल तरच घराबाहेर पडा!



प्रतिनिधी ४ जुलै

**मुंबई :** राज्यभरात पावसाचा जोर कायम असताना मुंबईमध्ये देखील आज सलग चौथ्या दिवशी मुसळधार पावसाने जोर कायम ठेवला आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शहरातील अनेक भाग पूर्णपणे भिजून निघाले असून, आजही पावसाचा जोर कमी होण्याची चिन्हे नाहीत. हवामान विभागाने मुंबईसाठी आज रेड अलर्ट जारी केला असून, दिवसभरात काही ठिकाणी अतिमुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सर्व यंत्रणा सतर्क केल्या असून, महापालिका, आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन दल आणि इतर आपत्कालीन यंत्रणा हाय अलर्टवर आहेत. नागरिकांनी अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, सखल भाग, समुद्रकिनारे आणि धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, आजचा दिवस मुंबईकरांसाठी महत्त्वाचा ठरणार असून, हवामान विभागाच्या इशाऱ्यामुळे संपूर्ण यंत्रणा परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. मुंबईत गेल्या २४ तासांत मुसळधार पाऊस झाला असून अनेक ठिकाणी १०० मिमीहून अधिक पावसाची नोंद करण्यात आली आहे. गेल्या २४ तासांत मुंबईत मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली असून शहर आणि उपनगरांतील अनेक भागांमध्ये १०० मिमीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील काही तासही मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. महापालिकेच्या पर्जन्यमापन केंद्रांनुसार, सर्वाधिक १४६.४ मिमी पावसाची नोंद एच-पश्चिम प्रभाग कार्यालयात झाली आहे.

## हवामान खात्याकडून अतिमुसळधार पावसाचा इशारा, विकेंडला रेड अलर्ट

**मुंबईसह आज कुठे-कुठे रेड अलर्ट**

महाराष्ट्रात ४ ते ७ जुलै दरम्यान जोरदार पावसाची शक्यता असून काम असेल तरच घराबाहेर पडा, असे आवाहन मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे. संभाव्य परिस्थिती पाहता मुंबईतील पालिका आणि आपत्ती व्यवस्थापन सर्व यंत्रणा हाय अलर्टवर आली आहे. मुंबईत अतिमुसळधार पावसाचा अंदाज असून गेल्या २४ तासांत मुसळधार पाऊस कोसळला आहे. तर मुंबई आणि ठाण्याला आज आणि उद्या रेड अलर्ट आहे. यासह, ठाणे, पुणे घाटमाथा, पालघर, सातारा, रायगड या जिल्ह्यांना देखील रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# तांदुळवाडी किल्ल्यावर अडकलेल्या सहा पर्यटकांची सुखरूप सुटका!

**पालघर :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटनाचा मोह पर्यटकांच्या जीवावर बेतल्याची घटना तांदुळवाडी किल्ल्यावर घडली. नालासोपारा, विरार आणि डहाणू येथील सहा पर्यटक किल्ल्यावरून परतताना मुसळधार पाऊस, दाट धुके आणि निसरड्या वाटेमुळे वाट चुकले. मात्र, सफाळा पोलिसांनी वेळीच दाखवलेल्या तत्परतेमुळे या सहाही पर्यटकांचे प्राण वाचले आहेत.

३ जुलै रोजी चार युवक आणि दोन युवती असे सहा पर्यटक तांदुळवाडी किल्ल्यावर फिरण्यासाठी गेले होते. मात्र, डोंगरावरून उतरताना पावसाचा जोर वाढल्याने आणि धुके दाटल्याने त्यांचा रस्ता भरकटला. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी न घाबरता तातडीने ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधला. ही माहिती मिळताच सफाळा पोलीस ठाण्याचे पथक तातडीने तांदुळवाडीच्या दिशेने रवाना झाले. स्थानिक पोलीस पाटील सुजित पाटील यांच्याशी समन्वय साधून स्थानिक रेस्क्यू टीमला मदतीसाठी पाचारण करण्यात आले. रेस्क्यू टीमने कठीण हवामानात शोधमोहीम राबवून सर्व सहा पर्यटकांचा शोध घेतला आणि त्यांना सुरक्षितपणे खाली आणले.

चौकशीदरम्यान हे सर्वजण दांडेकर महाविद्यालयाचे विद्यार्थी असल्याचे समोर आले. पोलिसांनी पालकांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली आणि विद्यार्थ्यांना पावसाळ्यात दुर्गम भागात फिरताना घ्यावयाची खबरदारी तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याबाबत समज दिली. त्यानंतर त्यांना सफाळा रेल्वे स्थानकावर सुरक्षित पोहोचविण्यात आले. या कारवाईमुळे संभाव्य अनर्थ टळला असून, सफाळा पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

**सफाळा पोलिसांचे नागरिकांना महत्त्वाचे आवाहन**

सध्या सुरु असलेला मुसळधार पाऊस, दाट धुके, निसरडे रस्ते, वेगवान पाण्याचा प्रवाह व अचानक बदलणारे हवामान यामुळे तांदुळवाडी धबधबा व किल्ला परिसरात जीवितास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पावसाळ्यात तांदुळवाडी धबधबा व तांदुळवाडी किल्ल्यावर पर्यटन टाळा.

# मुंबईत सलग चौथ्या दिवशीही पावसाचा जोर कायम!

## ◆ नवी मुंबई, ठाणे, भिवंडी आणि पालघरमध्ये शाळांना सुट्टी

प्रतिनिधी ४ जुलै

**मुंबई :** गत चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. नवी मुंबई, ठाणे, भिवंडी व पालघरमध्ये पावसाचा जोर कायम असल्याने शाळांना सुटी देण्यात आली आहे. तसेच मुसळधार पावसाचा मुंबई मेट्रोला फटका बसला असून, मेट्रोची येलो लाईन पूर्ण ठप्प पडली आहे. वसई-विरारमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे.

मुंबईत २४ तासांत मुसळधार पाऊस; अनेक ठिकाणी १०० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली असून, गेल्या २४ तासांत मुंबईत मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली असून शहर आणि उपनगरांतील अनेक भागांमध्ये पाणी साचले आहे. मंत्रालयाकडून आलेल्या हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील तीन तासांत पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड आणि जळगाव या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

**मुंबईत अनेक मॅनहोल अजूनही उघडे**

मॅनहोलमध्ये पडून एका मुंबईकराचा मृत्यू होऊनही मुंबई महानगर पालिका सतर्क नाही. मुंबईत अनेक मॅनहोल अजूनही उघडेच आहेत. मुंबईच्या महापौर रितू तावडे पाहणी दौरा करताना मॅनहोल उघडे असल्याचे निदर्शनास आल्याची बाब उघड झाली आहे. कॉटन ग्रीन परिसरात पाहणी दौरा करताना मॅनहोल उघडे असल्याने महापौरांचा संताप अनावर झाला होता. महापौर रितू तावडे यांनी कारवाईचे आदेश देऊनही मॅनहोलकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.



या अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पालिका प्रशासन सज्ज झाले आहे. शहरात कुठेही पाणी साचल्यास किंवा आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी घाबरून न जाता तातडीने महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीडच्या परळी सह परिसरात पावसाने सकाळपासून दमदार हजेरी लावल्याचं दिसून आलंय. परळी तालुक्यात जून महिन्यात खूपच कमी प्रमाणात पाऊस झाला होता त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या पावसाची अपेक्षा होती. आज सकाळपासूनच परळी सह परिसरात वरून राजा जोरदार बरसताना दिसत आहे. आज झालेल्या पावसामुळे शेतातील रखडलेल्या पेरण्यांना गती भेटणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच पेरण्या केल्या आहेत त्या पिकांना देखील या पावसाचा मोठा फायदा होणार आहे.

# आरबीआयचा बँक ऑफ बडोदाला 63.60 लाखांचा दंड!

प्रतिनिधी ४ जुलै




**मुंबई :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून बँका, फायनान्स कंपन्या, हाऊसिंग फायनान्स कंपन्यांच्या कामकाजाचं वेळोवेळी परीक्षण केलं जातं. ज्या बँकांकडून बँकिंग संदर्भातील कायद्यांचं आणि आरबीआयच्या सूचनांचं पालन केलं जात नाही त्यांच्यावर आरबीआयकडून विविध प्रकारे कारवाई केली जाते. आरबीआयनं ३० जूनच्या आदेशाद्वारे बँक ऑफ बडोदाला ६३.६० लाख रुपयांचा दंड केला आहे. आरबीआयनं ३ जुलै रोजी प्रसिद्धीपत्रक जारी करुन यासंदर्भातील माहिती दिली आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार बँक ऑफ बडोदाला केवायसी आणि फेअर प्रॅक्टिसेस कोड फॉर लेंडर्सच्या काही तरतुदींचं पालन न केल्यानं दंड करण्यात आला आहे. आरबीआयनं बँक ऑफ बडोदाचं ३१ मार्च २०२५ च्या आधारे परीक्षण केलं होतं. त्यामध्ये आरबीआयला काही त्रुटी आढळल्या होत्या. त्या संदर्भात बँकेला कारणे दाखवा नोटीस देण्यात आलं होतं. यानंतर बँकेचं उत्तर मिळाल्यानंतर आरबीआयनं दंडात्मक कारवाईसाठी दोन कारणं दिली आहेत. त्यानुसार बँकेनं काही कर्ज खात्यांमधून निश्चित व्याज दरापेक्षा अधिक व्याज वसूल केलं. तर दुसरं कारण म्हणजे बँक ऑफ बडोदाला निश्चित वेळेत खातेदारांची केवायसी निश्चित वेळेत केंद्रीय केवायसी रजिस्ट्रीमध्ये अपलोड करण्यात अपयश आलं.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून जीआयसी हाऊसिंग फायनान्स कंपनीला ३.१० लाख रुपयांचा दंड केला आहे. आरबीआयच्या केवायसी संदर्भातील निर्देशांची पूर्तता न करण्यात आल्यानं ही दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. नॅशनल हाऊसिंग बँक कायदा १९८७ च्या सेक्शन ५२ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करत कारवाई करण्यात आली आहे. आरबीआयनं दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्यानंतर जीआयसी हाऊसिंग फायनान्सनं दिलेल्या उत्तरानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. जीआयसी फायनान्स कंपनी खात्यांच्या जोखमीसंदर्भातील वर्गीकरणाचा रिपोर्ट देण्यात अपयशी ठरल्यानं ही कारवाई करण्यात आली.

**महाराष्ट्रातील दोन बँकांना आर्थिक दंड**

निर्मल अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर या बँकेला १ लाख रुपयांचा दंड केला आहे. यासाठीची कारणं देखील आरबीआयनं त्यांच्या प्रसिद्धीपत्रकात दिली आहेत. प्राधान्य क्षेत्रासाठीच्या लिमिटस ऑन एक्स्पोजर टू सिंगल अँड ग्रुप बॉरोअर्स / पार्टीज अँड लार्ज एक्सपोजरस अँड रिव्हिजन संदर्भातील आरबीआयच्या सूचनांच्या नॉन कम्प्लायन्ससाठी दंडात्मक कारवाई करण्यात आली. याशिवाय काही ठेवीदारांना अधिक व्याज दरानं व्याज देण्यात आल्याचं म्हटलं. पुण्यातील धर्मवीर संभाजी अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणे महाराष्ट्रला दहा हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे. ही दंडात्मक कारवाई केवायसी रेकॉर्ड निश्चित कालमर्यादेत सेंट्रल केवयासी रेकॉर्डस रजिस्ट्रीत अपलोड करण्यात बँकेला अपयश आल्यानं ही कारवाई करण्यात आली.

# अण्णांच्या घोषणेमुळे सरकार घाबरले; उपोषणापूर्वी आरटीआय नियमांमधील बदल थांबवले!



राजेश जायस्वाल ४ जुलै

**मुंबई :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी अनिश्चित काळासाठी उपोषणाची घोषणा केल्यानंतर, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २ जुलै रोजी महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ मधील अनेक वादग्रस्त बदलांना स्थगिती देण्याचे आदेश दिले. गेल्या महिन्यात अण्णा हजारे यांनी इशारा दिला होता की, जर राज्य सरकारने माहिती अधिकार नियमांमधील दुरुस्त्या तात्काळ मागे घेतल्या नाहीत, तर ते ५ जुलै, २०२६ पासून अहिल्यानगर जिल्ह्यातील राळेगण सिद्धी गावात उपोषण सुरू करतील.

महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६ मध्ये अनेक महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित होते, ज्यात वाढीव अर्ज शुल्क, माहिती अधिकारासाठी कारण देण्याची आवश्यकता आणि ओळखीचा अनिवार्य पुरावा यांचा समावेश होता. याशिवाय, प्रत्येक अर्जात केवळ एकाच विषयावर माहिती मागितली जावी, अशी अटही होती. परंतु गुरुवारी, मुख्यमंत्री फडणवीस यांनी माहिती अधिकार कायद्याच्या मुख्य आयुक्तांना नव्याने अधिसूचित केलेल्या नियमांना स्थगिती देण्याचे निर्देश दिले. कायद्यातील दुरुस्त्यांमुळे नाराज झालेल्या अण्णा हजारे यांनी फडणवीस सरकारला हे नियम मागे घेण्याचे आवाहन केले होते. या दुरुस्त्यांमुळे माहिती अधिकार कायद्याचा मूळ हेतू कमकुवत होतो आणि नागरिकांना सरकारी माहिती मिळवणे अधिक कठीण होते, असा आरोप त्यांनी केला होता. माहिती अधिकार नियमांमधील बदल मागे न घेतल्यास ५ जुलैपासून अनिश्चित काळासाठी उपोषण सुरू करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता.

१२ जून रोजी अनेक महत्त्वाचे बदल करण्यात आले. सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या आणि १२ जून, २०२६ रोजी शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेनुसार, नवीन नियम प्रसिद्ध होताच तात्काळ अंमलात आले. नवीन नियमांनुसार, माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागणाऱ्या प्रत्येक अर्जदाराला ३० रुपये अर्ज शुल्क भरावे लागेल.

या नियमांनुसार, माहिती अधिकार अर्जातील विषय साधारणपणे एकाच विषयापुरता मर्यादित असावा, असेही नमूद केले आहे. १५० शब्दांपेक्षा जास्त नसलेली शब्दमर्यादाही निश्चित करण्यात आली आहे. जर एकापेक्षा जास्त विषय असतील, तर माहिती अधिकारी (PIO) फक्त पहिल्या विषयावरच प्रक्रिया करू शकतात आणि अर्जदाराला उर्वरित विषयांसाठी स्वतंत्र अर्ज दाखल करण्याचा सल्ला देऊ शकतात. मुख्यमंत्री फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात अण्णा हजारे यांनी म्हटले आहे की, नवीन नियमांमुळे प्रक्रियेत अडथळा येतो, खर्च वाढतो आणि अपील प्रक्रिया गुंतागुंतीची होऊन उत्तरदायित्व कमकुवत होते. त्यांनी असाही आरोप केला की, हे नियम जनतेशी सल्लामसलत न करता लागू करण्यात आले आहेत. त्यांनी मागणी केली की, सरकारने हे नियम तात्काळ रद्द करावेत आणि आरटीआय तज्ज्ञ, माहिती आयुक्त, सामाजिक कार्यकर्ते, वकील, पत्रकार आणि नागरिक यांच्याशी सल्लामसलत करून नवीन नियम तयार करावेत. मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी फडणवीस सरकारच्या वतीने अण्णा हजारे यांची भेट घेऊन त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला, परंतु या चर्चेतून कोणताही ठोस परिणाम साधला गेला नाही. आरटीआय नियमांच्या निषेधार्थ अण्णा हजारे ५ जुलैपासून उपोषणाला बसणार होते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, नवीन नियम लोकशाही आणि पारदर्शक शासनाच्या विरोधात आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A3072, RRC Helpline No. 8484842135